# अर्थशास्त्र

## बी.ए. तृतीय वर्ष (सेमिस्टर VI)

- डॉ. प्रज्ञा बागडे

## करांचे वर्गीकरण

## (Classification of Taxes)

वर्तमान काळात प्रत्येक सरकार विविध करांच्या सहाय्याने उत्पन्न मिळवते. जस जसा सरकारचा खर्च वाढत जातो. तस तसा करांचा व्यापही वाढत जातो. त्याचबरोबर कल्याणकारी राज्याची संकल्पना मान्य केल्यामुळे सरकारला विविध प्रकारची कामे पार पाडावी लागतात. त्यामुळे वाढता खर्च भागविण्यासाठी सरकारला नवे नवे कर शोधावे लागतात. सरकारी उत्पन्नाचे निरनिराळे स्त्रोत आहे. परंतु त्या सर्वांमध्ये कर हा स्त्रोत सर्वात महत्वाचा आहे. त्यामुळे सरकारला निरनिराळ्या प्रकारचे कर लावून उत्पन्नात वाढ करावी लागते.

### करांचे वर्गीकरण

**(Classification of Taxes)**

करांची वेगवेगळी वर्गीकरणे करण्यात आली आहे. करांचे स्वरुप, करांची पद्धती, करांची रचना, त्याचे उद्देश इत्यादी दृष्टीकोनातून करांचे वर्गीकरण करण्यात आले आहे करांचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात येते.

१) प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर

२) मूल्यानुसार कर व विशिष्ट कर

३) पुरोगामी, प्रमाणबद्ध, प्रतिगामी व ऱ्हासमान पुरोगामी कर

४) एककर व बहुकर पद्धती

**१) प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर**

मध्ययुगीन काळापासून अर्थशास्त्रज्ञांनी करांचे वर्गीकरण प्रत्यक्ष कर व अप्रत्यक्ष कर या दोन वर्गात करण्याचा प्रयत्न केला आहे. प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कर हे दोन्ही शब्द काहीसे अस्पष्ट राहीले कारण त्यांची खरी व्याख्या कधीही केली गेली नाही.

प्रो. बुलक यांनी आपल्या पुस्तकात दिलेली व्याख्या “उत्पादनावर लावलेला कर प्रत्यक्ष तर उपभोगावर लावलेला कर अप्रत्यक्ष”, “उत्पन्नावर लावलेला कर प्रत्यक्ष तर खर्चावर लावलेला कर अप्रत्यक्ष”

जे. एस. मिलच्या मते, ज्या वेळेस सरकारचा उद्देश ज्या व्यक्तीवर कर लावला तिनेच तो सहन केला पाहिजे असा असतो तेव्हा तो कर ‘प्रत्यक्ष कर’ पण ज्या वेळेस व्यक्तीवर लावलेला कर ती दुसऱ्यावर ढकलू शकते आणि सरकारचा ही उद्देश तिनेच तो कर भरावा असा नसेल तर तो कर ‘अप्रत्यक्ष’ कर होय.

प्रो. फिंडले शिरास यांनी कर देण्याच्या पद्धतीनुसार करांचे वर्गीकरण केले आहे. जे कर व्यक्तीच्या संपत्तीवर व उत्पन्नावर त्वरीत लागू केले जातात व जे उपभोक्त्याकडून सरळ सरकारकडे भरले जातात ते प्रत्यक्ष कर होत या उलट उरलेले सगळे कर ज्यांचा सरकारकडे प्रत्यक्ष भरणा होत नाही, ते अप्रत्यक्ष कर होत.

डॉ. डाल्टन यांनी याच प्रकारचे वर्गीकरण केले आहे. त्यांच्या मते प्रत्यक्ष कर म्हणजे तो कर की जो त्या व्यक्तीवर लावला जातो त्या व्यक्तीकडून खरोखरच भरल्या जातो. या उलट अप्रत्यक्ष कर एका व्यक्तीला लावला जातो पण अंशतः वा पूर्णतः दुसऱ्या व्यक्तीकडून भरल्या जातो.

# प्रत्यक्ष कराचे गुण

**(Merits of Direct Taxes)**

### १) न्यायपूर्णता (समता)

प्रत्यक्ष कर हे न्यायपूर्ण असतात. ते समता तत्वाचे पालन करतात. या करांचा भार गरीब व्यक्तींवर कमी व श्रीमंत व्यक्तीवर जास्त पडतो. म्हणूनच हे कर न्यायपूर्ण आहेत.

### २) निश्चितता

प्रत्यक्ष करामध्ये निश्चितता हा गुणधर्म असतो. कर किती द्यावयाचा? कधी द्यावयाचा, कराचा दर काय हे सर्व करदात्याला निश्चितपणे माहिती असते. त्याचप्रमाणे सरकारला सुद्धा हे निश्चितपणे माहिती असते की प्रत्यक्ष करापासून किती उत्पन्न मिळणार आहे.

### ३) लवचिकता

प्रत्यक्ष करामध्ये लवचिकता हा गुणधर्म असतो. लवचिकता म्हणजे सरकारला ज्यावेळेस जास्त उत्पन्न पाहिजे असते अशा वेळेस सरकार प्रत्यक्ष करांच्या दरात वाढ करते. लोकांच्या उत्पन्नात जस जशी वाढ होते त्याचप्रमाणात करांच्या दरातही वाढ होते.

### ४) कर्तव्यपरायणता

प्रत्यक्ष करांमुळे नागरिकांमध्ये जागरुकता निर्माण होते. प्रत्यक्ष कर हे ज्या व्यक्तीवर आकारला जातो त्याच व्यक्तीला तो भरावा लागतो. त्यामुळे करदाता या कराचा भार स्वत: सहन करतो. त्यामुळे या करांची रक्कम सरकार कशा रितीने खर्च करते याकडे करदात्याचे लक्ष असते. त्याचप्रमाणे तो करारोपणाबद्दलही जागरुक असतो.

### ५) काटकसर

प्रत्यक्ष करामध्ये काटकसरीचे तत्व दिसून येते. कारण प्रत्यक्ष कराची वसूली करण्याचा खर्च हा तुलनात्मकदृष्ट्या कमी येतो. त्याचप्रमाणे करदाता स्वत:च प्रत्यक्ष कराची रक्कम सरकारला देत असतो. त्यामुळे प्रत्यक्ष कराची संपूर्ण रक्कम सरकारच्या तिजोरीत जमा होते.

## प्रत्यक्ष कराचे दोष

**(Demerits of Direct Taxes)**

### १) गैरसोय

बऱ्याच वेळा प्रत्यक्ष कर हे करदात्याला गैरसोयीचे वाटतात. कारण या कराच्या आकारणीसाठी करदात्याला आपले उत्पन्नाचे वार्षिक वितरण, उत्पन्न मिळविण्याचे इतर स्त्रोत असल्यास ते कोणते हेही सांगावे लागते. तसेच हे कर एकरकमी असतात. त्यामुळे ते करदात्याला गैरसोयीचे वाटते.

### २) अप्रियता

प्रत्यक्ष कर हे प्रामुख्याने अप्रिय असतात कारण हे कर करदात्याला इतरांवर ढकलता येत नाही. करदात्याला या कराचा भार स्वत:लाच सहन करावा लागतो.

### ३) अप्रामाणिकपणा

प्रत्यक्ष कर हा व्यक्तीच्या प्रामाणिकपणावर आकारला जातो. जर व्यक्ती ही अप्रामाणिक असेल तर ती व्यक्ती प्रत्यक्ष कर टाळण्यासाठी सरकारला खोटी माहिती देते. प्रत्यक्ष करामध्ये सरकारला फसवून कर टाळण्याचा प्रयत्न होत असतो. परंतु ज्यावेळेस कराचे दर जास्त असतात त्याच वेळेस असा प्रयत्न होत असतो.

### ४) कमी उत्पन्न गटाला सूट

करारोपण करतांना प्रत्यक्ष कराचाच उपयोग केल्यास कमी उत्पन्न असणारा गट हा करारोपणापासून मुक्त राहील. कारण अशा लोकांचे उत्पन्न हे कमी असल्यामुळे त्यांची करदेय क्षमता देखील कमी असते. न्याय तत्वानुसार करदेय क्षमतेच्या प्रमाणात कर आकारणी व्हावी अशी सर्वांची अपेक्षा असते.

प्रत्यक्ष करांमध्ये जरी वरील दोष दिसून आले असले तरी त्याला काही मूलभूत आधार नाही. परंतु आज प्रत्यक्ष कर हेच अत्यंत लाभदायक व अनिवार्य सिद्ध झाले आहेत.

## अप्रत्यक्ष कराचे गुण

**(Merits of Indirect Taxes)**

### १) लवचिकता

अप्रत्यक्ष करांमध्ये लवचिकता हा गुणधर्म आढळून येतो. सरकारला आपल्या उत्पन्नात वाढ करायची असल्यास सरकार या करांमध्ये वाढ करते. सामान्यत: हे कर आवश्यक वस्तूंवर लावले जातात. कारण आवश्यक वस्तूंची मागणी किंमत अलवचिक असते. परंतु त्यामुळे अशा कराचा भार श्रीमंतांच्या तुलनेत गरीब वर्गावर अधिक पडतो.

### २) सुविधाजनक

अप्रत्यक्ष कर हे लोकांना सुविधाजनक वाटतात. कारण या कराची रक्कम ही एका टप्प्यामध्ये द्यावी लागत नाही. ती वेळोवेळी लहान लहान रकमेमध्ये द्यावी लागतात. हे कर वस्तू व सेवांच्या किंमतीमध्ये समाविष्ट असतात. त्यामुळे करदात्याला या कराचा विशेष भार जाणवत नाही.

### ३) कर टाळता येत नाही

करदाता अप्रत्यक्ष कर टाळू शकत नाही. कारण हे कर वस्तूच्या किंमतीमध्ये समाविष्ट झालेले असतात व वस्तू खरेदी करतांनाच हा कर द्यावा लागतो. जर व्यक्तीने वस्तू खरेदी केली नाही तर त्याला कर द्यावा लागत नाही.

### ४) उत्पादक

अप्रत्यक्ष करापासून मिळणाऱ्या उत्पन्नात सरकार मोठ्या प्रमाणात वाढ करु शकते. अलवचिक मागणी असणाऱ्या वस्तूंवर अधिक करारोपण केल्यास सरकारला अप्रत्यक्ष करापासून जास्त उत्पन्न मिळू शकते. म्हणूनच अप्रत्यक्ष करामध्ये उत्पादकता गुणधर्म असतो असे म्हणतात.

### ५) सामाजिक कल्याण

समाजाच्या आरोग्याच्या दृष्टीने घातक असणाऱ्या वस्तूंचा उपभोग कमी करण्याच्या दृष्टीकोनानुसार अशा वस्तूंवर जबरदस्त कर आकारणे योग्य ठरते. उदा. सिगारेट, दारु, अफू, गांजा इत्यादी.

## अप्रत्यक्ष कराचे दोष

### (Demerits of Indirect Taxes)

### १) प्रतिगामित्व

अप्रत्यक्ष कर हे प्रतिगामी स्वरुपाचे असतात. हे कर श्रीमंताच्या तुलनेत गरीबांवर जास्त करभार टाकतात. वास्तविक पाहता गरीबांपेक्षा श्रीमतांवर करभार अधिक पडला पाहिजे म्हणजे ही कर पद्धती पुरोगामी स्वरुपाची असायला हवी. अप्रत्यक्ष कर हे पुरोगामी नसून प्रतिगामी स्वरुपाचे आहे.

### २) वसूलीचा जास्त खर्च

अप्रत्यक्ष कराची वसूली करण्यासाठी खूप मोठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज ठेवावी लागते. कराची वसूली करणे व कराचे निर्धारण करण्यासाठी मोठा कर्मचारी वर्ग सज्ज ठेवावा लागतो. त्यामुळे अप्रत्यक्ष कराच्या वसूलीच्या खर्चात वाढ होते.

### ३) बचतीवर विपरीत परिणाम

अप्रत्यक्ष कर हे किमतीमध्ये समाविष्ट झालेले असतात. त्यामुळे आवश्यक वस्तूंच्या किंमतीमध्ये वाढ होऊन त्याचा परिणाम आवश्यक वस्तूंच्या खरेदीसाठी लोकांना जास्त खर्च करावा लागतो. यामुळे लोकांची बचत कमी होऊन बचतीवर विपरीत परिणाम होतो.

### ४) अनिश्चितता

वेगवेगळ्या करांपासून किती उत्पन्न मिळेल याचे बिनचूक अंदाज सरकारी अधिकारी काढू शकत नाही. कारण या उत्पन्नाचा संबंध वस्तूच्या मागणीच्या लवचिकतेशी आहे. म्हणजेच वस्तूची मागणी कमी लवचिक आहे की जास्त लवचिक. जास्त लवचिक वस्तूंवर करांची आकारणी केल्यामुळे वस्तूंच्या किमतीत वाढ होते व याचा परिणाम मागणी कमी होते. अशा वेळी सरकारला किती उत्पन्न मिळेल हे निश्चित सांगता येत नाही.

### ५) अकर्तव्यपरायणता

अप्रत्यक्ष कर करदाते लहान लहान रकमेत वेळोवेळी देत असतात. त्यामुळे या कराचा भार त्यांना फारसा जाणवत नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये जागरुकता नसते. आपण किती कर दिला. आपण दिलेल्या कराच्या रकमेचा योग्य कामासाठी उपयोग झाला की नाही याबाबत लोक उदासिन असतात.

## २) मूल्यानुसार कर व विशेष कर

**(Ad-Valorem & Specific Duties)**

कराची आकारणी ही वस्तूंच्या मूल्यानुसार, वजनानुसार, इतर आधारानुसार होते.

### मूल्यानुसार कर

जेव्हा कर वस्तू किंवा संपत्तीच्या मूल्यानुसार आकारला जातो तेव्हा त्याला मूल्यानुसार किंवा मूल्यवार कर (Ad-Valorem) असे म्हणतात. हा कर वस्तूच्या किंमतीच्या शेकडा प्रमाणात व्यक्त करण्यात येते. उदा. २ टक्के, ३ टक्के. भारत, कॅनडा, अमेरिका व ऑस्ट्रेलिया या देशांमध्ये जकातीवर लावण्यात आलेला कर मूल्यानुसार आकारण्यात येतो.

### विशेष कर

हा कर वस्तूच्या वजनानुसार किंवा दुसऱ्या एखाद्या प्रमाणानुसार आकारण्यात येतो. उदा. वस्तूच्या दर क्विंटलमागे, दर मिटर कापडामागे अशा प्रकारे. जर्मनीत मूल्यानुसार कराऐवजी विशिष्ट कर आकारणे अधिक पसंत करतात. भारतात जकात कर हे सामान्यत: मूल्यानुसार आकारले जातात. विशिष्ट कर हे सरळ व सोयीचे असतात. तसेच ते प्रतिगामी स्वरुपाचे ठरतात. हे कर हलक्या प्रतीच्या वस्तूंवर तुलनात्मकदृष्ट्या अधिक करभार पडतो. व या वस्तू गरीब लोक जास्त खरेदी करतात. त्यामुळे या कराचा भार श्रीमंतापेक्षा गरीबांवर अधिक पडतो. त्यामुळे मूल्यानुसार कर हे विशिष्ट करापेक्षा श्रेष्ठ मानले जातात.

### ३) कर आकारणीच्या दरावरुन प्रकार

कर आकारणीच्या दरावरुन करांचे वर्गीकरण

### अ) पुरोगामी किंवा अधिप्रमाण कर

या प्रकारात कर आकारणी ही व्यक्तीच्या उत्पन्नाच्या आधारावर केली जाते. उत्पन्नात वाढ झाल्यास करांच्या दरातही वाढ होते तेव्हा त्याला पुरोगामी किंवा अधिप्रमाण कर असे म्हणतात.

खालील उदाहरणावरुन पुरोगामी कराची संकल्पना स्पष्ट होते

| **उत्पन्न** | **कराचे दर** | **कराची एकूण रक्कम** |
|---|---|---|
| २०,००० | ५ टक्के | १००० |
| ३०,००० | १० टक्के | ३००० |
| ४०,००० | १५ टक्के | ६००० |
| ५०,००० | २० टक्के | १०,००० |

### ब) प्रमाणबद्ध किंवा अनुपातिक कर

सर्व प्रकारच्या उत्पन्न पातळीसाठी कराचा दर एकच असतो. उत्पन्नाच्या आधारावर कराची आकारणी केली जाते. उत्पन्नाची सारणी व कराचे दर दिलेले असतात. यात व्यक्तीच्या उत्पन्नातील बदलानुसार कराचे दर बदलतात. व्यक्तीचे उत्पन्न दुप्पट झाल्यास कराची रक्कम दुप्पट होते व व्यक्तीचे उत्पन्न निम्मे झाल्यास कराचे दर निम्मे होतात. हे पुढील उदाहरणावरुन स्पष्ट होते.

| उत्पन्न | कराचे दर | एकूण कर |
|---|---|---|
| २०,००० | ५ टक्के | १००० |
| ३०,००० | ५ टक्के | १५०० |
| ४०,००० | ५ टक्के | २००० |
| ५०,००० | ५ टक्के | २५०० |

**क) प्रतिगामी किंवा न्यून प्रमाण कर**

या प्रकारात व्यक्तीच्या उत्पन्नात होणाऱ्या वाढीबरोबर या कराचे दर कमी होत असेल तर त्याला प्रतिगामी किंवा न्यून प्रमाण कर असे म्हणतात. उत्पन्नातील वाढीबरोबर कराचे दर कमी होतात. उत्पन्नातील घटीबरोबर कराचे कर वाढतात.

| उत्पन्न | कराचे दर | कराची एकूण रक्कम |
|---|---|---|
| १०,००० | १० टक्के | १,००० |
| २०,००० | ८ टक्के | १,४०० |
| ३०,००० | ७ टक्के | १,५०० |
| ४०,००० | ५ टक्के | १,६०० |

**ड) ऱ्हासमान पुरोगामी कर**

हा कर प्रारंभी सौम्य पुरोगामी स्वरुपाचा असतो. त्यामुळे जास्त उत्पन्न असणाऱ्या व्यक्तींना न्याय त्याग करावा लागत नाही. अशा करांना समता तत्वानुसार ऱ्हासमान पुरोगामी कर असे संबोधण्यात येते. यात एका विशिष्ट उत्पन्नाच्या पातळीपर्यंत कराचे दर हळूहळू वाढतात व एका विशिष्ट उत्पन्नाच्या पातळीनंतर कराचा दर एकच असतो.

| उत्पन्न | कराचे दर | कराची एकूण रक्कम |
|---|---|---|
| २०,००० | ८ टक्के | १६०० |
| ३०,००० | १० टक्के | ३०० |
| ४०,००० | १२ टक्के | ४८०० |
| ५०,००० | १३ टक्के | ६५०० |
| ६०,००० | १३ टक्के | ७८०० |
| ७०,००० | १३ टक्के | ९१०० |

### ४) एककर व बहुकर पद्धती

एक कर व बहुकर पद्धती याबाबत अनेक अर्थशास्त्रज्ञांमध्ये मतभेद आहे. निसर्गवादी अर्थशास्त्रज्ञांनी भूमीवर एक कर असावा असे प्रतिपादन केले. त्यांच्या मते सर्व कराचा भार शेवटी भूमीवरच पडतो. अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ हेनरी जॉर्ज यांनी आपल्या Progress & Poverty या ग्रंथात भूमीवर एक कर आकारण्याचा प्रस्ताव दिला.

उत्पन्न, संपत्ती, घर इत्यादीवर एक कर पद्धत असावी असे प्रतिपादन करण्यात आले. कारण ही पद्धती सरळ व सोपी असून यात कराची वसूली करण्याचा खर्च कमी येतो.

### बहुकर

एक कर पद्धतीमध्ये अनेक दोष दिसून आल्यामुळे बहुकर पद्धतीचा स्विकार करण्यात आला. या पद्धतीत विविधता, सार्वत्रिकता, पर्याप्तता, उत्पादकता, लवचिकता इत्यादी करांची तत्वे दिसून येतात. या पद्धतीत व्यक्तीच्या करदेय क्षमतेनुसार करांची आकारणी केली जाते. तसेच उत्पन्न व संपत्तीचे योग्य वाटप करुन आर्थिक विषमता कमी

करुन आर्थिक विकासाला गती देता येते. त्यामुळे बहुविध कर प्रणाली विद्यमान काळात आवश्यक ठरते.

# अपेक्षित प्रश्न

## दिर्घोत्तरी प्रश्न

१) प्रत्यक्ष कर व अप्रत्यक्ष कराच्या संकल्पना स्पष्ट करुन त्यांचे गुणदोष स्पष्ट करा.

२) कराच्या दरावरुन करांचे प्रकार कोणते ते सोदाहरण स्पष्ट करा.

## लघुत्तरी प्रश्न

१) प्रत्यक्ष कर म्हणजे काय? त्याचे गुणदोष स्पष्ट करा.

२) अप्रत्यक्ष कर म्हणजे काय? त्याचे गुणदोष स्पष्ट करा.

३) एक कर पद्धती व बहुकर पद्धती म्हणजे काय?

४) पुरोगामी किंवा अधिप्रमाण कर म्हणजे काय?

५) प्रमाणबद्ध किंवा अनुपातिक कर म्हणजे काय?

६) प्रतिगामी किंवा न्यूनप्रमाण कर म्हणजे काय?

७) ऱ्हासमान पुरोगामी कर म्हणजे काय?